आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.१० वाजता

१४ जानेवारी २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हवामान विभागानं नागरिकांचं जीवनमान सुलभ केल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार

- पाकव्याप्त काश्मीरशिवाय जम्मू काश्मीर अपूर्ण असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्या मुंबईत नौदलाच्या ताफ्यात २ युद्धनौका आणि १ पाणबुडी समाविष्ट होणार

**आणि**

- प्रयागराजमधल्या महाकुंभ मेळ्यात मकरसंक्रांतीच्या अमृत स्नानात साडेतीन कोटी भक्तांचा सहभाग

**<><><><><>**

विज्ञानानं सर्वसामान्यांचं जीवनमान सोपं करावं आणि हवामान विभाग या कसोटीवर पात्र ठरत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भारतीय हवामान विभागाच्या दीडशेव्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. देशातल्या ९० टक्के जनतेला हवामान विभागाच्या सुविधांचा लाभ होतो. मागील १० दिवस आणि आगामी १० दिवसांच्या हवामानाची माहिती सामान्य नागरिकांना आता सहज मिळते, असं ते म्हणाले.

हवामानशास्त्र विभागाच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त एका विशेष नाण्याचं अनावरणही त्यांनी केलं. विभागाच्या मिशन मौसमची सुरुवात प्रधानमंत्र्यांनी केली.

**BYTE (pm-Future ready- 0 TO 24 Sec)**

IMD विजन-२०४७ चं प्रकाशनही मोदी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

पाकव्याप्त कश्मीरशिवाय जम्मू कश्मीर अपूर्ण आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. ते आज जम्मू कश्मीरमधे अखनूर इथं माजी सैनिकांच्या मेळाव्याला संबोधित करत होते. भारतासाठी पाकव्याप्त कश्मीर हा मुकुटमणी आहे, तर पाकिस्तानसाठी तो केवळ दुसऱ्या देशाचा तुकडा आहे. तिथल्या जनतेनं पाकिस्तानला कायम नाकारलं आहे, असंही ते म्हणाले. तिथं धर्माच्या आधारावर भेदभाव केला जातो, दहशतवाद्याच्या प्रशिक्षणाचे तळ चालवले जातात, त्यावर भारत योग्यवेळी पावलं उचलेल, असा इशारा त्यांनी दिला.

पाकिस्ताननं दहशतवादाला पाठबळ देणं कायम ठेवलं आहे. पाकव्याप्त कश्मीरची भूमी दहशतवादासाठी वापरली जात आहे, पाकिस्ताननं आपले वाईट हेतू सोडून दिले पाहिजेत, असंही ते म्हणाले.

यावेळी राजनाथ सिंग यांनी १०८ फूटाचा राष्ट्रध्वज फडकावला तसंच अखनूर इथं वारसासंग्रहालयाचं उद्घाटनही केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्या मुंबईत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या दोन युद्धनौका, तर आयएनएस वाघशीर ही पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होईल. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी एकाचवेळी नौदलाच्या ताफ्यात सहभागी होणार आहे.

निलगिरी ही स्टेल्थ फ्रिगेट प्रकारातली आणि सुरत ही विनाशक प्रकारातली युद्धनौका तसंच वाघशीर या स्कॉर्पियन श्रेणीतल्या पाणबुडीचा यात समावेश आहे. दोन्ही युद्धनौकांवर दिवसा आणि रात्री हेलिकॉप्टर उतरू शकतात आणि उड्डाण करू शकतात. महिला अधिकारी आणि जवानांना राहण्यासाठी या युद्धनौकांवर विशेष सोय आहे. माझगाव डॉकनं स्वदेशी बनावटीच्या युद्धनौका आणि पाणबुडी बनवली आहे.

याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही करणार आहेत.

**<><><><><>**

पुण्यात साजऱ्या होणाऱ्या ७७व्या लष्कर दिनानिमित्त उद्या बॉम्बे इंजिनियरिंग ग्रुपच्या मैदानावर भव्य संचलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी होणाऱ्या गौरवगाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग उपस्थित असतील. या कार्यक्रमात लष्कर पोलीस दल तसंच महाराष्ट्र एनसीसीचं महिला पथक सहभागी होईल. तसंच, भारतीय लष्करात वापरल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रं तसंच उपकरणांचा समावेशही संचलनात होईल. या कार्यक्रमात प्रथमच नेपाळचा लष्करी वाद्यवृंदही सहभागी होईल.

**<><><><><>**

देशातल्या हळद उत्पादकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तसंच हळद उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यासाठी केंद्रसरकारने राष्ट्रीय हळद बोर्डाची स्थापना केली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज नवी दिल्ली इथं या हळदबोर्डाचं उद्घाटन केलं. तेलंगणात निजामाबाद इथं या

बोर्डाचं मुख्यालय असून श्री पल्ले गंगा रेड्डी त्याचे पहिले अध्यक्ष असतील असं गोयल यांनी सांगितलं. महाराष्ट्र, तेलंगण, आंध्रप्रदेश सह एकूण २० राज्यातल्या हळद उत्पादकांच्या उत्पन्नवाढीसाठी या मंडळामार्फत उपाययोजना करण्यात येतील. तसंच हळद उत्पादनाची नवीन तंत्र आणि पद्धतींविषयी तसंच हळदीच्या औषधी गुणांविषयी जनजागृती करण्यात येईल.

**<><><><><>**

गेल्या डिसेंबरमधे देशात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात २ पूर्णांक ३७ शतांश टक्क्यांनी वाढ झाली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने आज प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार अन्नधान्यांच्या किंमती काही अंशी घसरल्या मात्र कारखान्यात तयार होणारी उत्पादनं काहीशी महागली.

**<><><><><>**

पानिपतच्या युद्धाच्या शौर्य स्मारकासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. ते आज पानिपत युध्दाला २६४ वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त पानिपत इथं आयोजित मराठा शौर्य दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

या स्मारकासाठी अधिकची जमीन आवश्यक असल्यानं त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, तसंच या परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळाही राज्य शासनातर्फे उभारला जाईल, अशी घोषणाही फडनवीस यांनी केली.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा इथल्या आनंदवन महारोगी सेवा समिती संस्थेला ३ कोटी ८ लाख रुपयांचा निधी राज्य सरकारनं दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित

पवार यांनी हे निर्देश दिल्यानंतर ताबडतोब त्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली. कुष्ठरुग्णांचे उपचार आणि पुनर्वसनासाठी १ कोटी ८६ लाख रुपये तर, “आनंद अंध, मुकबधीर” आणि “संधीनिकेतन दिव्यांग कार्यशाळे”साठी १ कोटी २२ लाख रुपये, अशा निधीचा समावेश आहे.

**<><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर मकोका दाखल करण्यात आला आहे. तसंच कराड याचा ताबा एसआयटीकडे देण्याचा निर्णय न्यायालयानं घेतला आहे. प्रोडक्शन वॉरंट दाखवून कराड याचा ताबा एसआयटीकडे दिला जाईल, असं सीआयडीचे पोलीस उपअधीक्षक अनिल गुजर यांनी सांगितलं.

खंडणी प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडला केज इथल्या न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

**<><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाचे विद्यमान मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करायला केंद्र सरकारनं हिरवा कंदील दाखवला आहे. तर तेलंगण उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून करायलाही केंद्रानं मंजुरी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदानं ७ जानेवारी रोजी या नियुक्त्यांसंदर्भातली शिफारस केली होती.

**<><><><>**

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात आज मकरसंक्रांतीच्या दिवशी त्रिवेणी संगमात साडेतीन कोटी भक्तांनी पवित्र स्नान केलं. असंख्य भक्त

आणि संतांनी अमृत स्नानाचा आनंद लुटला. तसंच विविध आखाड्यांच्या महामंडलेश्वरांनीही मकरसंक्रांतीच्या दिवशी अमृत स्नान केलं. अमृत स्नानानंतर भक्तांनी घाटांवर पूजाअर्चा केली. तसंच अनेक भक्तांनी दानधर्मही केले. आज सकाळी झालेल्या गंगा आरतीला भाविक मोठ्या संख्येनं उपस्थित होते. यावेळी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परिक्षा पे चर्चा या कार्यक्रमासाठी यावर्षी विक्रमी नोंदणी झाली आहे. यामध्ये परदेशी विद्यार्थ्यांचं प्रमाणही लक्षणीय आहे, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं दिली आहे.

या कार्यक्रमासाठीच्या नोंदणीला १४ डिसेंबर २०२४ ला सुरुवात झाली असून, आज शेवटचा दिवस आहे.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेतल्या खाणदुर्घटनेत किमान शंभरजणांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. नॉर्थ वेस्ट परगण्यात असलेल्या या खाणीतल्या दुर्घटनेनंतर पोलिसांनी नोव्हेंबरमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरु केलं होतं. सुटका झालेल्यांपैकी एकाच्या सेलफोनमध्ये खाणीत खोलवर गाडल्या गेलेल्या मृतदेहांचे फोटो असल्याचं आढळून आलं. त्यामुळे पोलिसांनी नव्यानं शोधकार्य सुरु केलं. त्यानंतर अठरा मृतदेह काढण्यात आले आहेत. हे लोक अवैधरित्या खाणीत उतरले असावेत, असा अंदाज आहे.

**<><><><><>**

रशियाच्या विविध भागात काल रात्री युक्रेनने जोरदार क्षेपणास्त्र हल्ले केले. रशियन लष्कराने युक्रेनचे २०० ड्रोन तसंच पाच क्षेपणास्त्र पाडल्याचं वृत्त रशियन माध्यमांनी दिलं आहे.

दरम्यान युक्रेनबरोबर सुरक्षा हमीबद्दल चर्चेला मास्को तयार असल्याचं रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><>**

खो खो विश्वचषक स्पर्धेत नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी मैदानावर भारतीय महिला संघाचा सामना दक्षिण कोरियासोबत आणि पुरुष संघाचा सामना ब्राझीलशी होत आहे. पुरुष संघाने काल झालेल्या सामन्यात नेपाळवर ४२-३७ असा विजय मिळवला होता.

**//<><><><><>//**